# प्रेसनोट

दिनांक:- २६/०२/२०१९

## रस्ता सुरक्षेचे दृष्टीने वाहतूक शाखेतर्फे नागरिकांचे समुपदेशन

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनांची संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिज्ञता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणेबरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन मोटार सायकलस्वार यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करुन त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त, श्रीमती तेजस्वी सातपुते यांनी नियमित सुरु केलेला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून सोमवार दिनांक. २६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० वा. चे दरम्यान रस्ता सुरक्षा संदर्भात वाहन चालकांना समुपदेशन कार्यक्रमाचे ४७ वे सत्राचे आर.एस.पी शेड क्र. ३, पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास आय टी प्रोफेशनल श्री. कल्याणरमण वेंकटेशम, श्री. चेतन जवजाला डायरेक्टर इंडीयन रोड सेफ्टी अवेअरनेस ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीट्युट, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेश पुराणिक या मान्यवर वक्त्यांनी वाहन चालकांना मार्गदर्शन केले.

समुपदेशन कार्यक्रमाचे ४७ वे सत्राचे वेळी आय टी प्रोफेशनल श्री. कल्याणरमण वेंकटेशम यांनी हेल्मेट घेते वेळी कोणत्या बाबी तपासाव्यात याबाबत शास्त्रोक्त माहिती विशद केली. ती खालीलप्रमाणे.

१. हेल्मेट वर ब्रँड ऐकलेला असावा.

२. हेल्मेट वर या पैकी एखादा सर्टिफिकेशन असला पाहिजे- ISU. DOT. ECE. SNELL. सर्टिफिकेशन चे प्रिंट असला पाहिजे आणि स्टिकर नसावा.

३. हेल्मेट तुम्हाला घट बसला पाहिजे. जर ते लुज बसत असेल तर जास्त धोका आहे.

४. प्रत्येकाचा हेड शेप वेगळा असतो म्हणून मला बसणारा हेल्मेट तुम्हाला नीट बसेल याची खात्री नाही.

५. फुल फेस हेल्मेट जास्त सुरक्षा देते. हाफ फेस हेल्मेट सुरक्षा कमी देते.

६. हेल्मेटचा रंग भडक असावा.

७. हेल्मेट ओळखीच्या दुकानात घ्यावे कारण रोडवरचा हेल्मेट डुप्लिकेट असण्याची शक्यता आहे.

८. रायडर आणि पिललिऑन दोघांनी हेल्मेट घालणं अवश्यक आहे.

९. चिनस्ट्रप घातला पाहिजे आणि त्यात दोन बोटाच अंतर असला पाहिजे.

१०. हेल्मेट ची लाईफ हे एका अॅक्सिडेंट नंतर बाद होते.

११. हेल्मेट ऑनलाईन घेऊ नये कारण तुम्हाला ते नीट बसणार नाही.

श्री. चेतन जवजाला, डायरेक्टर इंडीयन रोड सेफ्टी अवेअरनेस ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीट्युट यांनी वाहन चालकांशी संवाद साधत त्यांना अपघाताच्या लाईव्ह व्हिडिओ दाखवून, प्रकरणाची गंभीरता समजावून सांगून,

हेल्मेट व सीट बेल्टची मनाला सवय लावण्याची गरज स्पष्ट केली. तसेच त्यांनी पुढे 1. Over Confidence 2. Over Speeding 3. Not Obeying Traffic Rules & Regulation 4. Improper Training 5. Faulty Vehicle 6. Driver Physhically And Mentally Unfit 7.Unworthy Roads ही अपघाताची मुख्य कारणे विशद केली.

श्री. चेतन जवजाला यांनी व्याख्यानाची सांगता **" वक्त मिलाता है जिंदगी बदलेने के लिए, जिंदगी दोबारा नही मिलेगी वक्त बदलेने के लिए "** या उक्तीने केली.

पोलीस निरीक्षक, राजेश पुराणिक, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी सदरवेळी सांगितले की, रस्ता सुरक्षेच्या मुख्य घटकांचा उपयोग करून रस्ता सुरक्षा संदर्भात व स्वयंशिस्त संबंधात शिक्षण व समुपदेशन देण्यात येत आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, समुपदेशन ही शिक्षा नसुन संधी आहे. वाहन चालवताना हेल्मेट/सिटबेल्ट परिधान करणे ही सक्ती नसून रस्ता सुरक्षेच्या शिस्तीचा भाग आहे. त्यामुळे स्वत:ची सुरक्षा होते.

तसेच सदर कार्यक्रमा दरम्यान मार्डन इंजिनअरींग कॉलेजचे प्राचार्य व विद्यार्थी यांनी पतनाटयद्वारे उपस्थित वाहनचालकांचे रस्ता सुरक्षा संर्दभात जनजागृती केली.

सदर कार्यक्रमास एकुण २३ वाहनचालक उपस्थित होते. त्यामध्ये महिला, विद्यार्थीवर्ग, व्यापारी व जेष्ठ नागरीक इत्यादी समाजातील सर्व घटकातील नागरीक उपस्थित होते. सदर समुपदेशन कार्यक्रमादरम्यान वाहन चालकांशी संवाद साधून त्यांचा सुद्धा प्रतिसाद समजावून घेण्यात आला.

पुणे शहर वाहतूक शाखेतील २२ विभागामार्फत सध्या रस्ता सुरक्षा संदर्भात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करुन त्यांना समुपदेशनासाठी बोलवण्यात येत आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे दि. ३१/१२/२०१५ रोजीचे शासन निर्णयाव्दारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांचे समुपदेशन करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

सदर कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. राजेश पुराणिक यांनी केले. त्यांना सदर कार्यक्रमासाठी वाहतूक शाखेच्या पोलीस उप आयुक्त, श्रीमती तेजस्वी सातपुते मार्गदर्शन लाभले.

दिनांक ०७/१२/२०१८ पासून आज पर्यंत (दिनांक - २५/०२/२०१९) एकुण ४७ समुपदेशनाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले आहेत. **सदर कार्यक्रमात एकुण ४,१६१ वाहनचालक उपस्थित होते.** त्यांना योग्य मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले आहे.